# स्वयंसेतूतर्फे बालगृहातील मुलांशी सुसंवाद

## वैयक्तिक स्वच्छतेबरोबरच परिसर स्वच्छता आवश्यक : डॉ. समीर आरेकर

रत्नागिरी : पू. सान गुरूजी जयंती दिनाचे औचित्य साधून स्वयंसेतूतर्फे रत्नागिरीतील बालगृहातील मुलांशी शैक्षणिक व आरोग्यविषयक सुसंवाद साधण्यात आला. एखाद्या संस्थेत राहूनही आपण आपले आचार, विचार व वर्तन योग्य राखून समाजात आपले स्थान निर्माण करू शकतो हे स्वयंसेतूच्या अध्यक्षा श्रद्धा कळंबटे यांनी कथेच्या माध्यमातून तसेच विविध उदाहरणे देवून स्पष्ट केले.

तसेच डॉ. समीर आरेकर यांनी वैयक्तीक स्वच्छता व समतोल आहार याविषयी माहिती देताना परिसर स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. आपल्या निष्काळजीपणामुळे आपण डेंग्युसारख्या आजाराला बळी पडू शकतो. म्हणूनच वैयक्तीक स्वच्छतेबरोबर परिसर स्वच्छतासुद्धा तितकीच महत्वाची आहे. हे त्यांनी मुलांना अगदी सहज, सोप्या भाषेत पटवून दिले.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अधिक्षक श्री. भोसले, वनश्री कांबळे, श्री. पवार उपस्थित होते. स्वयंसेतूतर्फे मुलांना केळी व गोष्टींची पुस्तके देण्यात आली. या सुसंवादात मुलांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला.

-प्रेषक श्रद्धा कळंबटे

फोटो ओळ - मुलांशी सुसंवाद साधताना डॉ. समीर आरेकर, सोबत श्रद्धा कळंबटे व बालगृह अधिक्षक श्री. भोसले.